Vol 1 Issue 7 Jan 2012

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN No-2231-5063 Vol.1,Issue.VII/Jan 2012pp.1-4

Research Paper

# महाराष्ट्र आणि महाराष्ट्र धर्माची राजकीय तत्वप्रणाली

*अनिल माणिकराव बैसाणे*


## *साराश :-भौगोलिक आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी :*

देश हा शब्द भौगोलिक संज्ञा या अर्थाने वापरला जात असे. आज राष्ट्र याचा पर्याप्त शब्द म्हणुन आपण देश हा शब्द वापरतो, तसा वापर होत नव्हता. तर एका विशिष्ट प्रदेशाला किंवा प्रांतासाठी देश म्हणुन संबोधिले जात असे. साधारणतः त्रिकोणाकृती असलेल्या आपल्या महाराष्ट्र देशाच्या पूर्वेला वैनगंगा, पश्चिमेस अरबी समुद्र, उत्तरेला सातपुडा पर्वतरांगा तर दक्षिणेस पंचगंगा अशा सीमा आहेत. उंचच उंच आणि दऱ्याखोऱ्यांचा, पठारांचा समावेश आहे. हिंस्त्र श्वापदाचे वास्तव्य असलेले घनदाट अरण्य, नद्या–नाले, डोंगरी किल्ले असलेला महाराष्ट्र स्वराज्य स्थापनेच्या कामात मोठा सहाय्यभूत ठरला आहे. अरबी समुद्रकिनाऱ्याचे बाजूने सहयाद्रीचा पट्टा उत्तर–दक्षिण दिशांनी जोडत असल्यामुळे आपल्या महाराष्ट्र देशाचे कोकण आणि देश असे दोन भाग पडले आहेत. साधारणतः30 मैल रूंद असलेला हा पट्टा अतिदुर्गम असल्यामुळे निसर्गतःच संरक्षणाच्या दृष्टीने महत्व लाभले आहे.


## *प्रस्तावना :-*

सह्याद्रीत उगम पावलेल्या भीमा, नीरा, गोदावरी, कृष्णा सारख्या नद्यांमुळे महाराष्ट्रातील प्रदेश सुपीक बनला आहे. असा सधन प्रदेश येथील भूमिपुत्रांकरिता वरदान होता तर शत्रुंकरिता प्रत्यक्ष मृत्युच होता. असा भौगोलिक विविधांगी वैशिष्टयांनी नटलेला हा महाराष्ट्र जणू काही स्वराज्य निर्माणाची हाक शिवरायांना देत होता असेच म्हणावे लागेल.[1] इ.स.पुर्वीच्या 1 ल्या शतकातील शिलालेखातील महारठ अशा उल्लेखावरून पुढे महाराष्ट्र असा शब्द रूढ झाला असल्याचे संशोधकांचे मत आहे. महाराष्ट्रात रठ्ठ नावाच्या अनेक जमातींचे अस्तित्व होते. सातवाहन, मौर्य, शिलाहार, यादव, राष्ट्रकुट ही याच जमातींची कुले होत. त्यांची राज्यव्यवस्था, विद्या व कला क्षेत्रातील प्रगती, त्यांनी निर्माण केलेली भारतीय वैभवशाली संस्कृतीची साक्ष आजही आपल्याला अजिंठा आणि वेरूळ येथील स्थापत्य कलेवरून मिळते. महाराष्ट्रातील 'मरहट्ट' किंवा 'रठ्ठ' या जमाती निर्देश शब्दावरून पुढे मराठा हा शब्द अस्तित्वात आला. मराठी भाषा असलेल्या मराठ्यांची काटकता, कष्टाळुवृत्ती, धाडशी शूरता, उदारता व प्रामाणिकता ही शरीर आणि गुणवैशिष्टये होती.[2] भारतात येवून गेलेले चीन विदवान युआन श्वांग मराठयांचे गुणविशेष नोंदवितांना म्हणतात की 'स्वाभिमानी व मितभाषी असलेले मराठे प्रामाणिक आणि साध्या आचार–विचारांचे आहेत. ते मित्रांशी कृतज्ञतेने आणि शत्रुंशी सुडभावनेने वागतात. प्राणाची बाजी लावणारे मराठे शत्रुला सावध करून हल्ले चढवित असतात. शरणार्थीला मात्र उदारतेने जीवनदान देतात'[3] असा हा महाराष्ट्रातील सर्व जाती–जमातींचा मिळुन बनलेला मराठा समाज मराठी भाषा आणि संस्कृतीचे संवर्धन करीत शिवरायांच्या स्वराज्य स्थापनेचा पाईक बनला.

## *'महाराष्ट्र' नावाची उत्पत्ती :*

आर्य भारतात येण्यापूर्वी या देशात अनेक वंशाचे मानवी समूह राहत होते. पुढे आर्य–अनार्य संस्कृती संगमातून नव्या संस्कृतीचा उदय झाला. महाराष्ट्राचा उगम इ. स. पूर्व पाच लक्ष ते तीस वर्ष मानला जातो. महाराष्ट्र नावाच्या उत्पत्तीबद्दल पहिला उल्लेख सन 782 मधील 'एरण' गावाच्या स्तंभलेखात आला. मोल्सवर्थच्या मतानुसार महार राष्ट्र ते महाराष्ट्र तर मल्लराष्ट्र ते महाराष्ट्र असेही मानले जाते. तसेच महारठीचा देश म्हणजे 'महारठ्ठ' आणि त्याचे संस्कृतरुप म्हणजे 'महाराष्ट्र' होय. किंवा 'महरहट्ट' या कानडी शब्दाचा 'मर–झाड', 'हट्ट–प्रदेश' म्हणजे जंगलयुक्त प्रदेश होय. तर 'महाराष्ट्री भाषा' बोलली जात असल्यामुळे महाराष्ट्र असे नाव पडले. असे असले तरी 'महानराष्ट्र' ते 'महाराष्ट्र' असाच उल्लेख सर्वत्र स्वीकारला गेला आहे.[4]

## *इस्लामी अंमल आणि महाराष्ट्राची अस्मिता :*

प्राचीन काळात मौर्य, सातवाहन, राष्ट्रकुट आणि चालुक्य घराण्यांच्या वैभवशाली राजवटी महाराष्ट्रात होवून गेल्यात. सन 1187 च्या सुमारास दक्षिणेस उदयास आलेल्या यादव वंशाची सत्ता महाराष्ट्रावर होती. देवगिरी हे त्यांचे प्रमुख सत्ता केंद्र होते. महाराष्ट्रीय जनता यादवांच्या वैभवशाली कालखंडात सुख–समृध्दीने नांदत होती. मात्र या समृध्दतेला सन 1294 मध्ये नजर लागली ती म्हणजे दिल्लीचा इस्लामी शासक सुलतान अल्लाउद्दीनच्या आक्रमणाची! त्याने देवगिरीचा पाडाव करून हिंदु राज्यसत्तेची परंपरा खंडित केली आणि वैभवशाली परंपरा असलेला महाराष्ट्र इस्लामी सत्तेच्या वर्चस्वात गेला. पुढे तर मोहम्मद तुघलकाने दिल्लीहुन राजधानी देवगिरीला आणून महाराष्ट्रीयनांचा विरोध मोडुन काढत मोठे अत्याचार चालविले. ज्या हजारो स्त्री पुरूषांना कब्द करून दिल्लीत पाठविलेत त्यांच्यात हरिहर व बुक्क हे बंधु होते. ते जबरदस्तीने मुस्लिम बनलेत तरी त्यांच्या ह्दयातील मराठी अस्मिता महंमदाला नष्ट करता आली नाही. त्यांनाच पुढे सुलतानाने दक्षिणेत पाठविले असता शृंगेरीचे शंकराचार्य श्रीमाधवाचार्य विद्यारण्य स्वामींनी त्यांना हिंदु धर्म आणि संस्कृतीच्या संवर्धनाची हाक देवून त्यांचे शुध्दीकरण केले. त्यांनीच पुढे सन 1336 मध्ये तुंगभद्रा नदीच्या काठी विजयनगर राज्याची स्थापना करून इस्लामी सत्ताचे आव्हान स्विकारले. याच वेळेस दक्षिणेत बहामनी सत्तेची स्थापना होवून दक्षिणेतच हिंदू–इस्लामी संघर्ष तेवत राहिला. तसेच बहामनींची आपसातील संघर्षात निजामशाही, आदिलशाही, कुतुबशाही, इमादशाही व बरीदशाही अशी पाच शकले झालीत. तरी त्यांचा आणि विजयनगरचा संघर्ष चालुच राहिला. त्यातच सन 1565 मध्ये पाचशाह्याविरूध्दच्या तालीकोटच्या लढाईत विजयनगरचा पाडाव होवून भारतातील एकमेव हिंदू साम्राज्याचा अंत झाला.[5] असे असले तरी महाराष्ट्रात मराठ्यांनी भारतभर अंमल प्रस्थापित केलेल्या इस्लामी सत्तेचे आव्हान स्विकारून सार्वभौम सत्तेच्या स्थापनेकरिता महान क्रांतीची वाटचाल चालविली होती. या क्रांतीचे नेतृत्व पुढे शिवरायांनी करून मराठी अस्मिता नष्ट करण्याचे इस्लामी स्वप्न धुळीस मिळविले.

### पाच इस्लामी राजवटी आणि मराठे :

तालीकोटाच्या लढाईनंतर पाचही शाह्यांमधील ऐक्य नष्ट होवून आपसातील संघर्षास प्रारंभ झाल्याने इमादशाहीस निजामशाहीने आणि बरीदशाहीस आदिलशाहीने गिळंकृत केल्याने ङ्गक्त तीनच शाह्या अस्तित्वात राहिल्या. म्हणुन तेथील पुर्वीच्या सुभेदारांनी त्यांना उत्तरेतील मुघल साम्राज्यशाहीचा धोका असल्याने महाराष्ट्रातील मराठ्यांची मदत उपकाराचीच होती. मराठी जनतेनेही आपसातील दुही आणि इस्लामी सत्तेचे प्राबल्या यामुळे मुस्लिम राज्यकर्त्यांशी जुळवून घेतले. म्हणुनच 17 व्या शतकाच्या सुरूवातीपासूनच भोसले, जाधव, घोरपडे, मोरे, शिर्के, मोहिते, गुजर अशी अनेक घराणी उत्तर महाराष्ट्राच्या निजामशाहीत आणि दक्षिण महाराष्ट्रातील आदिलशाहीत लष्करी आणि सनदी सेवेत कार्यरत होती. मराठ्यांनी मोठा पराक्रम गाजविला. यात जाधव आणि भोसले घराण्यांनी मोठा नावलौकिक मिळविला होता. लखोजीराव जाधव राजांचा सर्व सामर्थ्यशाली म्हणुन ग्रँट डङ्गने गौरवोद्गार काढले आहेत तर शहाजीराजांच्या पराक्रमावर प्रसन्न होवून आदिलशहाने महाराज ङ्गर्जद शहाजी भोसले असा सन्मान प्रदान केला होता.[6] एवढा पराक्रम असूनही या सर्व घराण्यांमध्ये कोणतेही ऐक्य नव्हते. साध्या वतनाच्या हव्यासा पोटी आपसांत संघर्ष होते. त्यामुळे स्वतंत्र अशा सार्वभौम राज्यांच्या स्थापनेची आस या घराण्यांमधील पराक्रमी वीर पुरूषांना नव्हती.

### महाराष्ट्र धर्म संकल्पना :

या काळात महाराष्ट्रातील जनतेला सुख–संपन्नता लाभावी. स्त्रियांचे पवित्र्य रोखले जावे, देव–धर्म आणि पवित्र स्थळांची सुरक्षितता राखली जावी, धार्मिक कर्मे घडुन त्यांची वृध्दी व्हावी अशी मनोकामना साधु–संतांची होती. आणि याचकरिता इस्लामी सत्तेचे उच्चाटन होवुन महाराष्ट्रात आपल्या राज्याची स्थापना व्हावे असा विचार व्यापकतेने विस्तारात गेला. याच विचाराला समर्थ रामदास स्वामींनी आपल्या लेखनात महाराष्ट्र धर्म म्हणून उल्लेख केला आहे. यवनांचा सर्वनाश एवढाच एक धार्मिक हेतू नसून यवनांचा सर्वनाशा बरोबरच स्वराज्याची स्थापना करणे. महाराष्ट्र धर्माचे उद्दीष्ट असल्याने महाराष्ट्र धर्मही अधिका–अधिक व्यापक अशी राजकीय सज्ञा या काळात अस्तित्वात आली होती. म्हणूनच आपल्या देशातील कोणत्याही पारंपारीक धर्म व पंथापेक्षा महाराष्ट्र धर्म ही राजकीय तत्व प्रणाली व्यापक अर्थांने महत्वपुर्ण होती. महाराष्ट्रातील सतं महात्म्यांनी ज्या महाराष्ट्र धर्माच्या उभारणीची आस धरली त्याच्याच उभारणी करीता शिवराय आणि त्यांच्या मावळ्यांनी आपले जिवीत कार्य ठरविले.

न्यायमूर्ती रानडे म्हणतात की, 'सामाजिक क्षेत्रात असलेली विषमता संतांनी नष्ट करून संतांनी महाराष्ट्राची भूमी ऐक्यभावनेने नांगरून तयार केली. त्यानंतरच शिवरायांना स्वातंत्र्यांची बी पेरणे शक्य झाले.' असाच अभिप्राय राजाराम शास्त्री भागवत आपल्या 'महाराष्ट्र धर्म' या लेखामध्ये नोंदवीतात. ते म्हणतात की, 'गीतेमधील भागवती धर्म हा महाराष्ट्र धर्माचा पाया होता की जो ज्ञानेश्वरादी संतांनी वेगळ्या भूमिकेवर महाराष्ट्र धर्माच्या पार्श्वभूमी वर उभा केला. याच धर्मासाठी शिवरायांचा अवतार झाला. तोच ज्ञानेश्वरांनी जिर्णोध्दार केलाला संतांचा विशाल धर्म होय.'

या मतांना मात्र वि. का. राजवाडे यांनी विरोध केला असला तरी मराठी संत हेच महाराष्ट्राच्या संस्कृतीचे प्रमुख शिल्पकार ठरतात. हेच ऐतिहासिक अभ्यासरून सिद्ध होतांना दिसते.[7]

### महाराष्ट्र धर्माचे स्वरुप:

महाराष्ट्र धर्म या संकल्पनेमुळे महाराष्ट्रीयन जनतेला एक नवा उत्साह व चेतना मिळाली. धर्म म्हणजे जो सर्वांना धरून ठेवतो किंवा धारणा धारण करण्याला आधार देतो तो धर्म. धर्मामुळे समाज गतीमान व नितीमान बनतो. समाजाची अधोगती रोखण्याचे कार्य धर्म करतो. मानवाला प्रामाणिक वागण्याची प्रेरणा देऊन अंधाराकडून उजेडाकडे, असत्याकडून सत्याकडे नेण्याचे कार्य धर्म करतो. 'महाराष्ट्र धर्म' मराठी भाषिक प्रदेशात घडून आलेली एक वैचारिक चळवळ होती. त्यांचे स्वरूप भक्तीआंदोलनाचे होते. सामाजिक आणि धार्मिक परिवर्तन घडवून आणणे हा धर्माचा उद्देश होता.[8]

### संदर्भ :

1.पवार डॉ. जयसिंगराव, शिवाजी आणि शिवकाल, फडके प्रकाशन, कोल्हापूर, 2001, पृ. 2
2.बिरादार टि. के., मराठ्यांचा इतिहास (शिवाजी आणि शिवकाल) इ. स. 1630 ते 1713, विद्याभारती प्रकाशन, लातुर, 2000, पृ. 58.
3.देशपांडे डॉ. प्र. न., मराठ्यांचा उदय आणि उत्कर्ष, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, 2001, पृ. 30—31.
4.गायकवाड, सरदेसाई, थोरात, हनमाने, मराठेकालीन संस्था व विचार, फडके प्रकाशन, कोल्हापूर, 1990 पृ. 9—10
5.आचार्य डॉ. धनंजय, मराठा सत्तेचा उदय, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2007, पृ. 10—11
6. पवार डॉ. जयसिंगराव, उपरोक्त, पृ. 8
7.कुलकर्णी अ. रा., खरे ग. ह. (संपा.), खंड 1 ला, शिवाजी आणि शिवकाल (1600 ते 1707), महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळासाठी, कान्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. पृ. 69—70
8. बिरादर टि. के., उपरोक्त, पृ. 47—48.



अनिल माणिकराव बैसाणे

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org